## फॅक्स संदेश

| | | |
|---|---|---|
| प्रति | :- | मा. पोलीस अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, औरंगाबाद. |
| माहितीस्तव | :- | १. मा. महासंचालक, अॅन्टी करप्शन ब्युरो, म.रा. मुंबई. |
| | | २. मा. अपर पोलीस अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, औरंगाबाद. |
| | | ३. मा. विभागीय वाहतुक अधिकारी बीड |
| पासुन | :- | पोलीस उप अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, औरंगाबाद. |

---

जा.क्रं.पोउपअ/ असीबी/सा.के./औबाद/२०२१- औरंगाबाद, दि. २६/१०/२०२१

---

| | | | |
|---|---|---|---|
| १. | फिर्यादी | :- | श्री. संतोष मारोती पोटे वय ३७ व्यवसाय नौकरी, लिपीक, महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ गेवराई आगार जि. बीड |
| २. | आरोपी लोकसेवक | :- | श्री. श्रीनिवास केरबा वागदरीकर, वय 34 वर्षे, व्यवसाय नोकरी, आगार व्यवस्थापक, महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ, गेवराई आगार जि. बीड |
| ३. | पो.स्टे. गु.र.नं. | :- | पोलीस स्टेशन गेवराई जि बीड गु.र.नं. ४९१ /२०२१ कलम ७ भ्र.प्र.अधि. १९८८ |
| ४. | गुन्हा घडला तारीख, वेळ व ठिकाण | :- | दिनांक २६/१०/२०२१ रोजी १६.२० चे सुमारास बीड गेवराई रोड वरील रामेश्वर शुज सेंटर, बस स्टॅन्ड जवळ गेवराई जि.बीड |
| ५. | गुन्हा दाखल तारीख व वेळ | :- | दिनांक २६/१०/२०२१ रोजी २२.५० वाजता. |
| ६. | आरोपी अटक तारीख व वेळ | :- | दिनांक २६/१०/२०२१ रोजी २३.५१ वाजता |
| ७. | जप्त केलेल्या लाचेची रक्कम | :- | १५,०००/-रुपये लाचेची रक्कम (अ.पा.लागलेली) |

**खुलासा :-**

सादर विनंती की, यातील तक्रारदार श्री संतोष पोटे यांनी दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक २६/१०/२०२१ रोजी महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ आगार गेवराई येथे लाचेच्या मागणीची पडताळणी केली असता श्री. श्रीनीवास केरबा, आगार व्यवस्थापक यांनी तक्रारदार श्री. संतोष पोटे यांच्याकडे पंच साक्षीदारा समक्ष तक्रारदार तक्रारदार यांचे विभागीय भांडार अधिकारी व सुरक्षा दक्षता अधिकारी म.र.प.म.बीड विभाग यांनी भांडार शाखेची आगार पातळीवर तपासणी केली असता त्यात काही त्रुटी आल्याने त्याबाबतचा अहवाल तक्रारदार यांचे बाजुने देवुन तक्रारदार यांच्या विरूध्द कारवाई न करण्यासाठी 15,०००/- रुपये लाचेची मागणी करुन सदर लाचेची रक्कम आणुन देण्याचे सांगीतले.

यावरून दिनांक २६/१०/२०२१ रोजी महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ आगार गेवराई परिसरात सापळा लावण्यात आला असता सता श्री. श्रीनीवास केरबा,आगार व्यवस्थापक यांनी तक्रारदार श्री. संतोष पोटे यांचेकडुन पंचसाक्षीदारा समक्ष १५,०००/- रुपये लाचेची रक्कम स्विकारल्यानंतर त्यांना पकडण्यात आले व लाचेची रक्कम त्यांचे पॅन्टचे समोरील डाव्या बाजुचे खिशातुन हस्तगत करण्यात आली आहे.

प्रस्तुत प्रकरणात लाचमागणी पडताळणी व सापळा कार्यवाही दरम्यान व्हाईस रेकॉर्डरचा वापर करण्यात आला आहे. प्रस्तुत प्रकरणात वर नमुद प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असुन श्री. श्रीनिवास केरबा वागदरीकर, वय 34 वर्षे, व्यवसाय नोकरी, आगार व्यवस्थापक, महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ, गेवराई आगार जि. बीड यांना दिनांक २६/१०/२०२१ रोजी २३.५१ वाजता अटक करण्यात आली आहे.

सदर गुन्हयाचा तपास पोलीस निरीक्षक श्री.संदीप राजपुत, अे.सी.बी. औरंगाबाद हे करीत आहेत.

सविनय सादर

27/10/21

(मारूती पंडीत)
पोलीस उप अधिक्षक,
अॅन्टी करप्शन ब्युरो, औरंगाबाद.